# प्रकरण ६. पाश्चात्य चित्रकला

## ● मध्ययुगीन चित्रकला

**(ख्रिस्ती व बायझंटाईन कला)**

मध्ययुगात बायझंटाईन साम्राज्याचा काळात इटलीच्या पूर्वेकडील साम्राज्यांतील कलेला 'बायझंटाईन कला' या नावाने संबोधले जाते. मध्ययुगीन काळातील चित्रकलेचा विचार करता प्रामुख्याने बायझंटाईन काळातील मोझाईक चित्र व गॉथिक काळातील रंगीत काचचित्रांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो.

बायझंटाईन कला ही ग्रीक रोमन आणि पौर्वात्य कलाविशेषांच्या मिश्रणाने बनली आहे. बायझंटीयन हे मूळचे ग्रीक शहर असल्याने तेथील कलेवर ग्रीक कलेचा प्रभाव पडणे अपरिहार्य आहे. बायझंटाईन कलाकारांनी चर्चच्या बाहेरील भागावर फार लक्ष दिले नाही. चर्चच्या बाहेरील जग हे दुःखी व पापी आहे. त्यातून सुटका करून घेण्यासाठी ईश्वराला शरण गेले पाहिजे अशी त्यांची कल्पना होती. म्हणून चर्चच्या अंतर्भागात स्वर्गीय वातावरण निर्माण केले गेले. यासाठी अंतर्भागातील चित्रशिल्पात वास्तवता, मानवी शरीराचे शारीरिक दृष्ट्या अचूक चित्रण किंवा यथादर्शन आढळत नाही. बायझंटाईन कलावंतांनी निर्माण केलेल्या प्रतिमा मर्त्य जगातील नसून त्या स्वर्गभूमीतील आहेत. त्यांना मानवी सौंदर्य नसून आध्यात्मिक स्वरूपाचे स्वर्गीय सौंदर्य आहे अशा प्रकारे त्या निर्माण केल्या आहेत व अशा प्रकारचे चित्रण संपूर्ण मध्ययुगातील पाश्चात्य कलेत केले गेले. मोझाईक चित्रे ही बायझंटाईन कलेची खास कामगिरी होय.

## मध्ययुगातील कला

**(रोमनिक्स व गॉथिक कला)**

पश्चिमेकडील युरोपीय देशात निर्माण झालेल्या कलेला रोमनिक्स कला म्हणतात. गॉथिक कला मध्ययुगीन कलेतील प्रमुख कलापरंपरा होय. अभिजात कला, पौर्वात्य कला आणि युरोपियन स्थानिक असंस्कृत टोळ्यांची कला या सर्वांच्या मिश्रणातून ही कला अस्तित्वात आली. इतर मध्ययुगीन कलाशैलीपेक्षा गॉथिक शैली अधिक संयमी व बौद्धिक स्वरूपाची होती. ख्रिश्चन धर्माच्या चौकटीत जुन्या विचारधारांचे नव्या कल्पनांशी झालेले मिश्रण असे तिचे स्वरूप होते.

अर्थपूर्ण रचनातंत्र व सौंदर्य याचा सुंदर समन्वय या कलेत झालेला आढळतो. तेराव्या शतकानंतर गॉथिक शैलीइतकी सार्वत्रिक लोकप्रियता लाभलेली दुसरी कोणतीही मौलिक कलाशैली उदयाला आली नाही. गॉथिक काळातील चर्चच्या अंतरबाह्य भागावरील रंगीत काचचित्रे हे तत्कालीन चित्रशैलीचे उत्कृष्ट उदाहरण होय. गॉथिक काळापूर्वी चर्चच्या अंतर्भागावर लक्ष केंद्रित केले जाई पण या काळात चर्चचे अंतरंग व बहिरंग यात संपूर्ण एकात्मकता साधली गेली. गॉथिक चित्रकला, वास्तुकलेशी अत्यंत निगडित होती. कॅथेड्रलच्या अंतर्भागातील एकूण सौंदर्याचा परिणाम घडवून आणणारा एक महत्वाचा घटक अशी ही रंगीत काचचित्रे होती.

## ● बायझंटाईन काळ :

### (१) मोझाईक चित्रे :

मोझाईक कला ही चित्रनिर्मिती किंवा सपाट पृष्ठभागावरील सजावट करण्याच्या कलेची एक शाखा आहे. रंगीत दगडांचे किंवा अशाच प्रकारचे अन्य वस्तूंचे तुकडे सपाट पृष्ठभागावर जडावकाम करून किंवा भिंतीवर सिमेंट किंवा चुन्याच्या गिलाव्यात बसवून ही चित्रे किंवा अलंकरण करण्यात येते. या रंगीत दगडांना किंवा तुकड्यांना 'तेसेरा' (Tesserac) म्हणतात. अशा चित्रात पार्श्वभूमीसाठी व कपड्यांसाठी मोठ्या आकाराचे तुकडे वापरतात. चेहऱ्यासाठी अगदी लहान आकाराचे तुकडे वापरले जातात. मागील

प्लास्टरला तुकडे चिकटून बसावेत म्हणून या तुकड्यांची मागील बाजू खडबडीत असे. रोमन लोक मोझाईकचा उपयोग खालील जमिनीच्या अलंकरणासाठी करत तर ख्रिश्चन कलेत व विशेषतः बायझंटाईन कलेत याचा उपयोग भिंती, कमानी व चर्चच्या मध्यवर्ती दालनातील विजय तोरणांसाठीही करण्यात आला.

मोझाईक चित्रात तेसेरा बसवताना ते मुद्दाम असमान पातळीवर बसवतात, त्यामुळे त्यावर पडणारा प्रकाश परावर्तित होताना ते तुकडे रत्नाप्रमाणे चमकतात. रोममधील अनेक चर्चमध्ये अशी सुंदर





मोझाईक चित्रे

मोझाईक चित्रे केलेली आहेत. रोममधील 'सांता कोस्तान्झा' व 'सांता पुदेन्झिआना' चर्चमधील ही मोझाईक चित्रे विशेष प्रसिद्ध आहेत.

चर्चेसमधून अंधार असेल मोझाईक्स थोड्याशा उजेडाने चमकतील व त्यामुळे प्रकाशमय ईश्वरी साक्षात्कार घडल्याचा आनंद प्रार्थना करताना मिळेल, असे मोझाईक सजावटीचे वैशिष्ट्य असावे.

### ● गॉथिक काळ :

### (२) रंगीत काच चित्रे :

गॉथिक कॅथेड्रलच्या उभ्या रचनेचे तीन भाग. यात सर्वात वरच्या भागाला 'क्लेरेस्टरी' म्हणतात. या वरच्या भागातील खिडक्यांतून प्रकाश आत येऊ शकतो. तसेच चर्चच्या समोरील भागात वरच्या बाजूस एक मोठी गोल आकाराची खिडकी असते, तिला 'रोझ विंडो' असे संबोधतात. गॉथिक कलाकारांनी क्लेरेस्टरी व रोझविंडो यांच्या अलंकरणासाठी रंगीत काचचित्रांची योजना केली. प्रकाश आत येण्याच्या कार्याला बाधा न आणता त्यांचे अलंकारणही साधले गेले. या रंगीत काचचित्रांत सुंदर नक्षी तयार करीत असत, त्याचप्रमाणे धार्मिक विषयांवरील चित्रेही यात निर्माण केली गेली. चित्रसंकल्पातील आकारांप्रमाणे रंगीत काचांचे तुकडे कापण्यात येत व ते शिशाच्या जाड पट्टीच्या साहाय्याने एकमेकांशी जोडले जात. मोठ्या आकारांच्या खिडक्यांत चित्रांतील तुकड्यांच्या स्थैर्यासाठी लोखंडी पट्ट्या उभ्या–आडव्या बसवत. त्यामुळे शिशाच्या तारेत गुंफलेले काचेचे तुकडे भक्कमपणे स्थिर राहत. रोझ विंडोमधील अलंकरणात लोखंडी पट्ट्या व शिशाच्या पट्ट्याद्वारे संपूर्ण नक्षी तयार करीत . वेलबुट्टीच्या नक्षीने खिडक्या अलंकृत करीत. अशाच अलंकरणाला 'ट्रेझरी' म्हणत. ट्रेझरीमधील रिकाम्या जागेत रंगीबेरंगी काचा बसवून डिझाईन पूर्ण केले जाई व काचचित्रातून प्रकाश आत येई व कॅथॅड्रलचा अंतर्भाग रंगीबेरंगी प्रकाशाने उजळून स्वर्गीय वातावरण निर्माण होत असे. रंगीत काचचित्रे ही गॉथिक कलेची खास देणगी आहे. शार्त्र कॅथेड्रलमधील रंगीत काचचित्रे प्रसिद्ध आहेत.



रंगीत काच चित्रे





**प्र.१. एका वाक्यात उत्तर लिहा.**

(१) गॉथिक चित्रकलेत कोणत्या तीन वैशिष्ट्यांचा समन्वय झाला आहे ?

(२) बायझंटाईन कला ही कोणत्या दोन कलाविशेषांनी बनली आहे ?

(३) राव्हेन्ना चर्चमधील कोणती दोन चित्रे विशेष प्रसिद्ध आहेत ?

(४) गॉथिक कलेची खास देणगी कोणती आहे ?

**प्र.२. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण करा.**

(१) मोझाईक चित्रात ............... पातळीवर टेसेरे बसवतात.

(२) चर्चच्या समोरील भागातील गोल खिडकीला ............... असे म्हणतात.

(३) चर्चच्या बाहेरील जग हे ............... व ............... अशी बायझन्टाइन कलाकारांची समजूत होती.

## सरावासाठी काही प्रश्न

**प्र.१ थोडक्यात उत्तरे द्या.**

(१) इटलीतील पूर्वेकडील साम्राज्यांतील कलेला कोणत्या नावाने संबोधले जाते ?

(२) बायझंटाईन कला ही कोणत्या कलाविशेषांच्या मिश्रणाने बनली आहे ?

(३) पश्चिमेकडील युरोपीय देशांत निर्माण झालेल्या कलेला कोणती कला म्हणतात ?

(४) मोझाईक कला म्हणजे काय ?

(५) मोझाईक चित्र तयार करताना रंगीत दगडांचे मोठे तुकडे कशासाठी वापरतात ?

(६) मोझाईक चित्र तयार करताना प्लास्टरला तुकडे चिकटून बसावेत म्हणून काय करत असत ?

(७) टेसेरा म्हणजे काय ?

(८) मोझाईक चित्रात तेसेरा असमान पातळीवर का बसवत ?

(९) गॉथिक कलेने दिलेली खास देणगी कोणती ?

(१०) रोझविंडो कशास संबोधतात ?

(११) रोमन लोक मोझाईकचा उपयोग कशासाठी करत ?

(१२) बाटाझंटाईन कलेत मोझाईकचा उपयोग कशासाठी करण्यात आला ?

(१३) रंगीत काचचित्रे तयार करताना रंगीत काचांचे तुकडे कशाच्या साहाय्याने एकमेकांना जोडत असत ?

(१४) ट्रेझरी कशास म्हणत असत ?

(१५) शार्त्र कॅथेड्रल कशासाठी प्रसिद्ध आहे ?